
# संकल्पपूर्ती

२०१९ ते २०२२















**महापौर सौ. राखी संजय कंचर्लावार यांच्या कार्यकाळातील विकासकामे**











व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।



# आराध्य दैवत माता महाकाली





नमस्ते सते ते जगत्कारणाय
नमस्ते चिते सर्वलोकाश्रयाय!
त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यं
त्वमेकं जगत्कतृ प्राहर्तु !!



# शुभेच्छा संदेश



चंद्रपूरच्या प्रथम नागरिक महापौर सौ. राखी संजय कंचर्लावार यांच्या कार्यकाळातील राबवल्या गेलेल्या योजना आणि उपक्रमांवर त्यांच्या कर्तृत्वाचा आणि कल्पकतेचा जो ठसा त्यांनी उमटविला त्या साऱ्यांचा एकत्रित गोषवारा आपल्या "संकल्पपूर्ती" या पुस्तकातून त्या चंद्रपूरच्या जनतेसमोर सादर करीत आहे, ही अतिशय आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. एखाद्या मोठ्या पदाची जबाबदारी स्वीकारून त्याला आपलं पूर्ण बळ आणि शक्ती एकवटून न्याय देणं, त्यासाठी सतत प्रयत्नशील राहणं ही गोष्ट असाधारण आहे. कारण सामाजिक जीवनातील या कर्तृत्वाला त्यागाचे मोल उभं करावं लागतं. राखीताईनी महापौर पदाची जबाबदारी सांभाळताना हे असं त्यागाचं मोल या जबाबदारीच्या पाठीशी उभं केलं. या काळात त्यांचे पूर्ण चिंतन आणि मनन चंद्रपूरच्या विकासाच्या कल्पनेनं भारलेलं होतं. यातूनच अनेक सुंदर कल्पना प्रत्यक्षात राबवल्या गेल्या साकार झाल्या. कोविड काळाने जगात साऱ्यांचीच परीक्षा घेतली गेली. विशेषतः समाजाचे नेतृत्व त्यांच्या हाती होती, त्यांच्यासाठी तर हा कठीण परिक्षेचाच क्षण होता. राखीताईंनी या काळात महानगरपालिकेच्या वतीने कोविड रूग्णांसाठी ज्या योजना आखल्या आणि त्यांना मदतीचा हात देण्यासाठी जी पराकाष्ठा केली, ती अतिशय अभिनंदनीय आहे. या काळात महानगरपालिकेच्या वतीने गरजूंना जेवणाचे डबे वाटप करण्यात आले. धान्य किट वाटप केली गेली आणि रुग्णांची संपूर्ण व्यवस्था सांभाळण्याचा प्रयत्न केल्या गेला. ४५ बेडचे आसरा कोविड हॉस्पीटल निर्माण करून कोविड विरूध्दच्या संघर्षात ठोस कृतीने उत्तर देण्याचे प्रयत्न झाले. पीओपी गणेश मूर्तीवर पूर्णपणे बंदी घालून पर्यावरणस्नेही बाप्पा योजना राबवत कृत्रिम तलावांमध्ये गणपतीचे विसर्जन, रेन वॉटर हार्वेस्टींगला प्रोत्साहन, फिरते बाप्पा विसर्जन कुंड, सौंदर्यीकरण, अभ्यासकांसाठी अभ्यासिका निर्मिती, उद्यान निर्मिती असे आरोग्यविषयक, पर्यावरणविषयक, सौंदर्यीकरण, महिला विकास, अश्या सर्वांगीण विकासाच्या संकल्पना आणि उपक्रम त्यांनी एक ध्यास घेऊन चंद्रपूरात राबवल्या. स्वच्छ अमृत महोत्सवात चंद्रपूरला गौरव प्राप्त झाला. थ्री स्टार नामांकन प्राप्त झाले. महापौर पदाची जबाबदारी त्यांनी कौशल्याने आणि सर्वांप्रती न्याय या सूत्रानुसार सांभाळली, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य होय. उपक्रमशीलता, कल्पकता, धडाडी, नव्या कल्पनांचे स्वागत, त्याचा पाठपुरावा, सगळ्यांना सोबत आणि विश्वासात घेत वाटचाल करणे या गुणांनी त्यांचे नेतृत्व झळाळून गेले आहे. त्यांच्या वाटचालीचे मी अभिनंदन करतो आणि तेजोमय भविष्यासाठी सुयश चिंतितो.

हे सर्व काम करताना सोबतचे सहकारी उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, गटनेते व अन्य सर्व नगरसेवक यांचेही सहकार्य महापौरांना लाभले, ही सुध्दा समाधानाची बाब आहे.

**आपला स्नेहांकित**

## सुधीर मुनगंटीवार

**आमदार,**

**समिती प्रमुख, विधिमंडळ लोकलेखा समिती तथा माजी कॅबिनेट मंत्री (महाराष्ट्र)**








चंद्रपूर शहराच्या चौथ्या महापौर म्हणून सौ. राखी संजय कंचर्लावार यांची निवड झाली. १६ डिसेंबर २०१९ रोजी लोकलेखा समिती अध्यक्ष आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत पदग्रहण सोहळा पार पडला. त्यानंतर त्यांनी चंद्रपूर शहराचा कायापालट करण्यासाठी अनेक संकल्प केले. २०१९ ते एप्रिल २०२२ या अडीच वर्षांच्या कालावधीत केलेल्या विविध विकासकामांतून संकल्पपूर्ती झाली असून त्यांच्या या विकासकार्याचा घेतलेला हा आढावा.



पदग्रहण सोहळ्याचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





# मनोगत



चंद्रपूर हे गोंडकालीन ऐतिहासिक शहर आहे. शहराची प्रशासकीय व्यवस्था चालविण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून येथे नगरपरिषद होती. स्वातंत्र्यानंतर शहराच्या विकासाला गती आली. औद्योगिकीकरण होऊ लागले. रेल्वेचे जाळे विणले गेले. विविध प्रांतातून कामगार वर्ग येऊ लागला. शैक्षणिक सुविधांमुळे विद्यार्थी आणि कामाच्या संधीने शहरात नोकरदार वर्ग वाढला. चंद्रपूरची लोकसंख्या तीन लाखांच्या वर पोहोचली. २५ ऑक्टोबर २०११ मध्ये नगरपालिका बरखास्त करून महानगरपालिका स्थापन झाली. मागील १० वर्षांपासून येथे महानगरपालिका कार्यरत आहे. या नगराची द्वितीय महापौर (३० ऑक्टोबर २०१४ ते ३० एप्रिल २०१७) आणि चौथी महापौर म्हणून २२ नोव्हेंबर २०१९ ते २९ एप्रिल २०२२ पर्यंत मला सेवेची संधी मिळाली. दुसऱ्यांदा खुर्चीवर बसल्यावर अनेक आव्हाने होती. ती पेलण्याची ताकद आणि शक्ती जनतेच्या शुभेच्छा आणि प्रेमातून मिळाली. पुढील अडीच वर्षे कोणती कामे करायची, याची यादीच तयार केली आणि ती कामे पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

केंद्रात मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकासाला प्राधान्य देणारे सरकार आहे. देशाला जागतिक महासत्ता बनविण्याचे स्वप्न घेऊन त्या दिशेने प्रखर वाटचाल करणाऱ्या मा. नरेंद्र मोदी यांच्या भूमिकेचे समर्थन म्हणून चंद्रपूर महानगराला सुध्दा विकासाच्या वाटेवर नेण्याचा संकल्प केला. चंद्रपूर शहराचा चेहरामोहरा बदलविण्यात चंद्रपूर शहर महानगरपालिकेचा मोठा वाटा आहे. राज्याचे तत्कालीन अर्थ व नियोजन तथा वनमंत्री मा. श्री. सुधीरभाऊ मुनगंटीवार यांची दूरदृष्टी आणि मार्गदर्शनामुळे महत्वाचे निर्णय घेता आले. शासन स्तरावर विविध विभागाशी सुसंवाद स्थापन करुन अडचणीचे निराकरण करण्यात महत्वाची भूमिका पार पाडली. सुधीरभाऊंनी माझ्या कार्यकाळात जे पाठबळ उपलब्ध करुन दिले, त्यामुळेच मला महापौर पदाची कारकीर्द यशस्वीरित्या पार पाडता आली. याबद्दल मी त्यांची कायम ऋणी राहीन.

पदावर बसल्यानंतर अवघ्या काही दिवसातच कोरोना महामारीला प्रारंभ झाला. संपूर्ण कार्यकाळ कोरोनाशी लढण्यात गेला. मात्र, अशा परिस्थितीतही शहराच्या विकासाकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. २२ मार्च २०२० रोजी लॉकडाऊन सुरु झाल्यापासून उपासमार होणाऱ्या नागरिकांना जेवणाचे डबे, गरिबांना अन्नधान्य किट, दिव्यांग व्यक्तींच्या खात्यात ७५० रुपये, बाहेरून येणाऱ्या नागरिकांना विलगीकरण व्यवस्था, २५ लसीकरण केंद्र, कोरोना चाचणी केंद्र सुरु केले. शहरच नव्हे तर जिल्ह्यातील नागरिकांसाठी कोविड केअर सेंटर सुरु केले. या काळात महानगरपालिकेने अक्षरशः युद्धपातळीवर काम केले. त्याचप्रमाणे वन अकॅडमी, सैनिक स्कुलच्या माध्यमातून रुग्णांना एक चांगली सुव्यवस्था आपण देऊ शकलो. १०० टक्के लसीकरण, मातृत्व सन्मान, दिव्यांग व्यक्तींना सानुग्रह मदत, चौक सौंदर्यीकरण, अमृत पाणीपुरवठा योजना राबविली. २०२१ मध्ये स्वच्छ भारत अभियान - शहरी 2.0 चा भाग म्हणून गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'स्वच्छ अमृत महोत्सवा'मध्ये भारतातील सर्वात स्वच्छ शहरांच्या यादीतील पुरस्कार विजेत्यांत चंद्रपूरचा गौरव करण्यात आला. महापौर म्हणून कार्यरत असतांना आपले शहर हे देशातील अभिनव आणि विकसीत शहर व्हावे, याकरिता मी सतत प्रयत्नशील राहिले.

घरोघरी शौचालय हा उपक्रम यशस्वीपणे राबविला. स्वच्छतेच्या या कार्यासाठी चंद्रपूर शहराला विदर्भातून पहिले क्रमांक प्राप्त झाले. २०२० मध्ये महाराष्ट्रातून पहिल्या क्रमांकावर आले. माजी मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ शहराचा हा वसा हाती घेतला. स्वच्छ शहर आणि पर्यावरणीय शहर निर्माण करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या सर्व पदाधिकारी, नगरसेवक आणि अधिकारीवर्ग यांचा सक्रीय सहभाग व सहकार्य लाभले. २०१९ ते २०२२ या अडीच वर्षाच्या कार्यकाळात क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रातील तरुण-तरुणींना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी आणि प्रोत्साहित करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेने महापौर चषक २०२१ चे आयोजन केले. महाआरोग्य शिबीर आयोजन, जटपूरा गेट ते पाच देऊळ चौकापर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले. शिवाय

मनपातर्फे रामाळा तलाव परिसरात सौंदर्यीकरण करून रस्ता, स्ट्रीट लाईट, तलावाला स्टीलचे ग्रील व सिंगापूर पॅटर्न स्टॅच्यू उभारले. मौलाना अब्दुल कलाम आझाद बगीचाचे सौंदर्यीकरण व्हावे, यासाठी पुढाकार घेतला.

प्रशासकीय दृष्टिकोनातून आवश्यक असे अनेक महत्त्वाचे आणि कठोर निर्णय घ्यावे लागले. काही वेळेस नागरिकांचा रोषही पत्करावा लागला. मात्र, तशा निर्णयाने शहराचे भले झाले, याचा आनंद अधिक आहे. महापौरपदाच्या अडीच वर्षांच्या कारकिर्दीत अनेक खाचखळगे अनुभवायला मिळाले. अनेक चांगले-वाईट अनुभव आले. कुणी सुखावले तर कुणी दुखावले. मात्र, महानगरपालिकेच्या भल्यासाठी आणि शहराच्या उत्कर्षासाठी जे केले ते प्रामाणिकपणे केले. पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी या सर्वांनी आजपर्यंत चांगली साथ दिली. सांगायला बरेच काही आहे. हा संपूर्ण लेखाजोखा आमच्या सहृदयांनी या पुस्तकाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महापौर म्हणून माझ्या आतापर्यंतच्या कार्यकाळातील कार्य या विकास पुस्तिकेच्या माध्यमातून जनता जनार्दनापर्यंत पोहचविण्यासाठी ज्या चमूने आग्रह धरीत हे घडवून आणले, त्या संपूर्ण चमूचे मी अगदी मनापासून धन्यवाद मानते.

भारतीय जनता पक्षासारखा विकासशील राजकारण आणि समाजकारण करणारा पक्ष माझ्या पाठीशी सदैव होता. या विकासाची बांधलकी माणून कार्यरत राहील्यामुळेच मला मोठ्या प्रमाणात विकासकार्य करता आले, हे मी नम्रपणे नमूद करते. भाजपच्या लोकप्रतिनिधींनी कोणत्याही पदावर असतांना केलेल्या कामाचा अहवाल कार्य वृत्तांत स्वरूपात जनतेसमोर उपलब्ध करुन देण्याच्या चांगल्या परंपरेनुसार मी माझ्या कार्यकाळात केलेल्या कामांचा अहवाल आपल्या समोर ठेवत आहे. जनतेच्या विविध विकास कामांचा केलेला संकल्प आणि त्या दिशेने केलेल्या वाटचालीमुळे आज "संकल्पपूर्ती" झाली.

महानगरपालिकेतील सर्व पदाधिकारी, विरोधी पक्षातील सहकारी, प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी आणि या शहरातील नागरिकांचे मी मनापासून आभार मानते, जे माझ्या प्रत्येक कार्यात साथ देत आहेत. या शहराप्रति माझे जे स्वप्न आहे, त्या स्वप्नांना बळ देण्यासाठी यापुढेही आपली साथ अशीच लाभेल, या विश्वासासह मी माझ्या मनोगताला येथे पूर्णविराम देते.

**सौ. राखी संजय कंचर्लावार**
महापौर,
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

**राखी संजय कंचर्लावार यांची आकाशवाणी मुलाखत (क्यूआर कोड)**






## सौंदर्यीकरण

# मनमोहक आणि आकर्षक आझाद बगीचा

विविध चौक सौंदर्यीकरणाचे व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

**चंद्रपूर शहराच्या सौंदर्यीकरणासाठी आझाद बागेसह छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुशोभीकरण करून सौंदर्यीकरण करण्यात आले. यासह नागपूर रोडने चंद्रपूर शहरात प्रवेश करताना कुंदन प्लाझा चौकात आय लव्ह माय चंद्रपूर, आंबेडकर कॉलेजजवळ रामनगर-आकाशवाणी चौक, सिव्हिल्स लाईन्स रोड वरील हुतात्मा स्मारक जवळ, प्रियदर्शनी चौक येथील चौकाचे सुशोभीकरण करण्यात आले.**




व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

महात्मा गांधी मार्गावर शहराच्या हृदयस्थळी आझाद बगिचा आहे. या बगिचात दररोज शेकडो नागरिक येतात. पहाटेपासूनच नागरिकांची या बागेत वर्दळ सुरू होते. सायंकाळीही नागरिक मोकळ्या हवेत फिरायला या बागेत येतात. विशेष म्हणजे, वयोवृध्द व बालगोपालही या बागेत येतात. त्यासाठी आझाद बागेचे सौंदर्यीकरण करून बालगोपाल, वयस्क, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा आणि फिरण्याची व्यवस्था करण्यात आली. बगिच्यात नेताजी पार्क, स्केटिंग आणि योगा, बॅडमिंटन कोर्ट, चिल्ड्रेन पार्क, ज्योतिबा फुले पार्क, पाथवे, शहीद स्मारक पार्क, फ्लावर गार्डन, गार्डनिंग आणि लँडस्कॅपिंग, भव्य मंदिर, आकर्षक विद्युत दिव्यांची रोषणाई, भव्य पार्किंग आणि फूड कोर्ट देखील साकारण्यात आले आहे.

चंद्रपूर शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या या मौलाना अबुल कलाम आझाद बगीच्याच्या विकासकामाचे भूमिपूजन ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करून कामाला प्रारंभ करण्यात आला होता. तेव्हा महापौर राखी कंचर्लावार यांनी नागरिकांसाठी सर्व सोई-सुविधायुक्त आझाद बगीचा कार्यान्वित होईल, याची शाश्वती दिली होती. दिलेला शब्द पूर्ण करीत सर्व सोयी आणि सुसज्ज बगीचा लोकाच्या सेवेत दाखल झाला. काही ठिकाणी हिरवळ, प्रवेशद्वार, खेळणे आणि बसण्यासाठी आसने लावण्यात आली आहे. यासर्व सोयीयुक्त आझाद बगिच्याचे लोकार्पण लोकलेखा समिती अध्यक्ष तथा आमदार सुधीर मुनगंटीवार आणि खासदार बाळू धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत थाटात पार पडला.














व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।













# आय Love चंद्रपूर




व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

ब्लॅक गोल्ड सिटी अशी ओळख असलेल्या चंद्रपूर शहरात नागपूर मार्गाने प्रवेश करताच रस्त्याच्या डाव्या बाजूस दृष्टीस पडणारे "आय लव्ह चंद्रपूर" हे आकर्षक भित्तीशिल्प पर्यटकांच्या व शहरातील नागरिकांच्या कुतूहलाचा केंद्रबिंदू आहे. या शिल्पामध्ये चंद्रपूर शहराच्या अन्य वैशिष्ट्यांसह नगरीचे आराध्य दैवत माता महाकाली तसेच यात्रेतील पोतराज यांची प्रतिकृती देखील साकारण्यात आली आहे. वाघासाठी जगप्रसिद्ध पर्यटन स्थळ म्हणून आणि गोंडकालीन माता महाकाली मंदिरासाठी नावलैकीक असलेल्या चंद्रपूर शहरात पर्यटक भेट देत असतात. महानगरपालिकेच्या माध्यमातून नव्याने उभारण्यात आलेले "आय लव्ह चंद्रपूर" भित्तीशिल्प सेल्फी पॉईंट म्हणून नावारुपाला आले आहे. चंद्रपूर शहराच्या सीमेवर प्रारंभी आगमनाच्या ठिकाणी हॉटेल ट्राय स्टार नजीक करण्यात आलेल्या या सौंदर्यीकरणाचे लोकार्पण लोकलेखा समिती अध्यक्ष आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते लोकार्पण झाले.










# बालोद्यान, मित्रनगर चौक व हुतात्मा चौक
# सौंदर्यीकरण

चंद्रपूर शहरातील जटपुरा वार्ड येथील पंच तेली समाज हनुमान मंदिर परिसरातील सभामंडप, जटपुरा बालोद्यान तसेच मित्रनगर चौक व हुतात्मा चौकातील सौंदर्यीकरणाचा लोकार्पण सोहळा व संत जगनाडे महाराज सभागृहाचे उद्घाटन माजी अर्थमंत्री व विधिमंडळ लोकलेखा समितीचे अध्यक्ष आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी जटपुरा प्रभागातील जेष्ठ नागरिकांचा मान्यवरांच्या पाहुण्यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन सत्कार देखील करण्यात आला. पंच तेली समाज हनुमान मंदिर परिसरातील सभामंडप व जटपुरा बालोद्यान यांची निर्मिती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मंजूर केलेल्या ५० लक्ष रुपयांच्या आमदार निधीतून करण्यात आली.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





# जननायक भगवान बिरसा मुंडा चौक सौंदर्यीकरण

जननायक भगवान बिरसा मुंडा चौक सौंदर्यीकरण करण्यासाठी आदिवासी समाजबांधवांसह नगरसेविकांनी मागणी केली होती. त्यानुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेमार्फत रेल्वेस्थानक गेटसमोर शासकीय जागेवर सौंदर्यीकरण करण्यासाठी मनपाने मंजुरी प्रदान केली. चंद्रपूर रेल्वे स्थानक गेटसमोर चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने जननायक बिरसा मुंडा चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात येत आहे, त्याचा भूमिपूजन सोहळा गुरुवार, दिनांक १६ डिसेंबर रोजी माजी अर्थमंत्री, लोकलेखा समितीचे अध्यक्ष आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडला.





# अंचलेश्वर गेट ते बागला चौकपर्यंत डांबरीकरण रस्ता विकसीत

चंद्रपूर महानगरपालिका, चंद्रपूरच्या नागरी अनुसूचित जाती वस्ती सुधार योजना निधीअंतर्गत १ कोटी ७० लाख ५० हजार किंमतीचे अंचलेश्वर गेट ते बागला चौकपर्यंत डांबरीकरण रस्ता विकसीत करण्यात आला.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





















# चंद्रपुरातील भिंती झाल्या बोलक्या!

शहर महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येत असलेल्या माझी वसुंधरा २.०, आझादी का अमृत महोत्सव तसेच स्वच्छ सर्वेक्षण - २०२२ अभियानांअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात पर्यावरण संवर्धन, स्वच्छता अभियान, प्लास्टिक निर्मूलन आदी विषयांवर भित्तीचित्रे रेखाटण्यात आली. ही चित्रे शहरवासियांसह शहरात येणाऱ्या पर्यटकांचेही खास आकर्षण ठरली आहेत. यात कोरोना मुक्तीसाठी हात धुणे, मास्क लावणे आणि सामाजिक अंतर राखणे तसेच स्वच्छता, पर्यावरण या विषयी जनजागृती केली जात आहे.









# वीज दिव्यांच्या रोषणाईने नागपूर रोडवर झगमगाट

दिवाळीच्या शुभ पर्वावर धनत्रयोदशीच्या (२०२१) दिवशीपासून नागपूर रोडवरील प्रियदर्शिनी इंदिरा गांधी चौक ते नागपूर रोडवरील आय लव्ह चंद्रपूरपर्यंत दुभाजकावरील पथदिव्यांच्या खांबांना वीज दिव्यांची रोषणाई लावण्यात आली असून, त्यामुळे शहरातील या प्रमुख मार्गावर रात्रीच्या वेळी झगमगाट सुरू झाला आहे.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





# शिवराज्यभिषेक सोहळ्याची प्रतिकृती

**चंद्रपूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुशोभीकरण करून, सौंदर्यीकरण करण्यासाठी ३० ऑक्टोबर २०१५ रोजी भूमिपूजन महापौर राखी कंचर्लावार यांच्या कार्यकाळात करण्यात आले. शिवराज्यभिषेक सोहळ्याची प्रतिकृती साकारण्यात आली. त्याचा लोकार्पण सोहळा भाजपाच्या कार्यकाळात ऑगस्ट २०१७ रोजी लोकनेते सुधीर मुनगंटीवार आणि तत्कालीन गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांच्या उपस्थितीत पार पडला.**

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**

## सिंगापूर पॅटर्न स्टॅच्यू



रामशहा या गोंडराजाने रामाळा तलाव बांधला होता. या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी या तलावाचा उपयोग होत असे. तलावाच्या काठावरील मार्ग नादुरुस्त होता. शिवाय मोठी अस्वच्छता होती. त्यामुळे महिला, तरुण, तरुणी येथे फिरायला येऊ शकत नव्हत्या. महापौर राखी कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून जटपूरा गेट ते पाच देऊळ चौकापर्यंत रस्त्याचे काम करण्यात आले. शिवाय मनपातर्फे रामाळा तलाव परिसरात सौंदर्यीकरण करून रस्ता, स्ट्रीट लाईट, तलावाला स्टीलचे ग्रील व सिंगापूर पॅटर्नचा स्टॅच्यू उभारला. २२ फेब्रुवारी २०१७ रोजी त्याचे लोकार्पण झाले.

## हवेली गार्डन व राजनूर रेसिडेन्सी परिसरात विकास कामे



चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरच्या वतीने वडगाव प्रभाग क्रमांक ८मध्ये ओमकारनगर हवेली गार्डन परिसरातील हनुमान मंदिराजवळ व राजनूर रेसिडेन्सी परिसरात खुल्या जागेत विकासकामे व सौंदर्यीकरणाचे काम करण्यात येणार आहे. या विकासकामाचा भूमिपूजन समारंभ महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या हस्ते पार पडला. खुल्या जागेत खुली जिम, लहान मुलांसाठी खेळणी, हायमास्ट लाइट, वॉकिंग ट्रॅक आदी विकासकामे व सौंदर्यीकरणाचे काम करण्यात येणार आहे.








# चिन्मय उद्यानाचा लोकार्पण सोहळा

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

वडगाव प्रभाग क्रमांक आठ मधील विविध विकासकामांचे भूमिपूजन आणि चिन्मय उद्यानाचा लोकार्पण सोहळा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शनिवार ता. १७ जुलै २०२१ रोजी पार पडला. या उद्यानात विशेष तरतूद निधी अंतर्गत ग्रीन जिम उभारण्यात आले आहे. तसेच आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या विशेष निधीतून साकारण्यात आलेल्या संत गाडगेबाबा उद्यानाचा लोकार्पण सोहळा पार पडला. त्यानंतर वडगाव प्रभाग क्रमांक आठमध्ये लक्ष्मी नगर ते वडगाव सिमेंट काँक्रीट रस्त्याचे व भूमिगत नाल्यांच्या बांधकामाचे भूमिपूजन आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडले. धनोजे कुणबी समाज सभागृह येथे पार पडलेल्या कार्यक्रमात ॲड. पुरूषोत्तम सातपुते यांच्यासह या परिसरातील ज्येष्ठ नागरिकांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.





## संताजी सभागृहासमोरील खुल्या जागेचे सौंदर्यीकरण कामाचे भूमिपूजन

चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने मूल रोडच्या बाजूला असलेल्या संताजी सभागृहासमोरील खुल्या जागेचे सौंदर्यीकरण करण्याच्या कामाचे भूमिपूजन लोकलेखा समिती अध्यक्ष तथा माजी वित्त व नियोजन मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडले. यावेळी महापौर राखी संजय कंचर्लावार यांची प्रमुख उपस्थिती होती.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

## शास्त्रकार लेआऊट येथील खुल्या जागेत सौंदर्यीकरण




चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील शास्त्रीनगर प्रभाग क्रमांक २ मध्ये एकता गणेश मंडळांच्या खुल्या जागेत आणि बंगाली कॅम्प प्रभाग क्रमांक ४ मध्ये शास्त्रकार लेआऊट येथील खुल्या जागेत सौंदर्यीकरण आणि विकास कामे करण्यासाठी माजी वन व वित्त मंत्री तथा लोकलेखा समिती अध्यक्ष आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी महापौर राखी संजय कंचर्लावार यांची प्रमुख उपस्थिती होती.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





# कोविड-19

## कोरोनाशी लढा

२२ मार्च २०२० रोजी पहिल्या लॉकडाऊनपासून आजही कोरोनाशी दोन हात सुरूच आहेत. चंद्रपूर शहर महापालिकेच्या माध्यमातून प्रारंभी उपासमारी होणाऱ्या नागरिकांना जेवणाचे डबे पोहचविण्यात आले. गरिबांना अन्नधान्याची किट वाटप करण्यात आली. दिव्यांग व्यक्तींच्या खात्यात ७५० रुपये दिलेत. बाहेरून येणाऱ्या नागरिकांसाठी विलगीकरण व्यवस्था उभारली. २५ लसीकरण केंद्र, कोरोना चाचणी केंद्र सुरु केले. शहरच नव्हे तर जिल्ह्यातील नागरिकांसाठी कोविड केअर सेंटर सुरु केले. वन अकॅडमी, सैनिक स्कुलच्या माध्यमातून रुग्णांना एक चांगली सुव्यवस्था निर्माण झाली. तर `आसरा` या कोविड रुग्णालयाच्या माध्यमातून सेवेतील एक उणीव भरून निघाली.








## १२ महिन्यांचे मानधन दिले सहायता निधीत

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

कोरोनाच्या काळात गरिबातील गरिब व्यक्तींनाही गंभीर आजारांवरील उपचार मिळावेत, यासाठी महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी पंतप्रधान सहाय्यता निधीत आपल्या २ महिन्याचे मानधन जमा केले. तसेच १२ महिन्याचे मानधन जिल्हाधिकारी सहायता निधीत जमा केले. मानधनाचे धनादेश तत्कालिन जिल्हाधिकारी डॉ. कुणाल खेमनार आणि महानगरपालिका आयुक्त राजेश मोहिते यांना देण्यात आले.

# कोविड केअर सेंटर



कोरोनाची पहिली लाट आल्यापासून चंद्रपूर शहर महानगरपालिकेने कंबर कसून उपाययोजना आखल्या. साधारणतः दीड महिना कोरोनाला थोपवून धरलं होतं. मात्र, २ मे २०२० रोजी चंद्रपूर शहरात कोरोनाचा पहिला रुग्ण सापडला. मनपा प्रशासन युद्धस्तरावर कामाला लागले. बाधित रुग्णाचा निवासी परिसर सील करण्यात आला. त्यापाठोपाठ आठवडाभराने आणखी रुग्ण सापडले. रुग्णाचा परिसर सील करुन सोडीयम हायपोक्लोराईडची फवारणी करुन संपूर्ण परिसर निर्जंतुकीकरण करण्यात आला. मूल रोड येथील वन अकादमीतील कोव्हिड केअर सेंटरच्या माध्यमातून आरोग्यसेवा कार्यान्वित झाली. दुसऱ्या लाटेत सैनिकी शाळा येथे कोविड केअर सेंटर सुरु करण्यात आले. याशिवाय कोरोनाविरुद्ध लढण्यासाठी दूध डेअरी परिसरातील समाजकल्याण विभागाचे आदिवासी मुलींचे वसतिगृह आणि मुलांचे वसतिगृह येथे अनुक्रमे १८० आणि १२० खाटांची व्यवस्था, तसेच २५० खाटांच्या सुविधेसह शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात कोविड केअर सेंटर महानगर पालिकेने सज्ज ठेवले.

# पौष्टिक आहार



वन अकादमीच्या इमारतीमधील कोविड सेंटर येथे मनपातर्फे उच्च दर्जाची सुविधा पुरविण्यात आली. जेवणाची व्यवस्था उत्तम होती. सैनिक स्कूल येथील सुसज्ज इमारतीत कोविड केअर सेंटर उभारले. येथील रुग्णांना वेळेवर पौष्टिक आहार देण्यात आला. सकाळी ८ वाजता नास्ता, सकाळी ११ वाजता जेवण, सायंकाळी ४ वाजता चहा, रात्री ८ वाजता जेवण दिले जात होते. नाश्त्यामध्ये कडधान्ये, पोहे, चना सोबत दररोज विविध प्रकारचा नाश्ता व पौष्टिक आहार देण्यात आला. तसेच स्वच्छतेची नियमित काळजी घेण्यात आली.

# रुग्णवाहिका २४ तास सेवेत



रुग्णसेवेसाठी आयसीआयसीआय बँकेने देखील सीएसआर फंडातून चंद्रपूर शहर महानगरपालिका रुग्णवाहिका, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर आणि पीपीई किट भेट दिली. कोरोना संसर्गामुळे ऑक्सिजनची मागणी प्रचंड मागणी वाढल्याने ऑक्सिजन सिलिंडरचा तुटवडा भासू लागला होता. ही उणीव भरून काढण्यासाठी २ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर रुग्णालयांत आहेत. गंभीर रुग्णांना रुग्णालयात हलविण्यासाठी रुग्णवाहिका २४ तास सेवेत ठेवण्यात आली आहे.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# ४५ खाटांचे स्वतंत्र कोविड रुग्णालय








व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून रुग्णांवर तातडीने उपचार होण्याच्या दृष्टीने चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे ४५ खाटांचे स्वतंत्र कोविड रुग्णालय सुरु करण्याचा प्रस्ताव आला. ता. २२ एप्रिल रोजी महानगर पालिकेच्या राणी हिराई सभागृहात झालेल्या ऑनलाइन विशेष बैठकीत सभागृहाने त्यास मंजुरी दिली. अवघ्या १५ दिवसात चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या 'आसरा' कोविड रुग्णालयाची निर्मिती झाली. डॉक्टर, परिचारिका, फार्मासिस्ट, वॉर्डबॉयची नियुक्ती झाली. आता प्रत्यक्ष रुग्णसेवेसाठी मनपाचे 'आसरा' कोविड रुग्णालय सज्ज आहे. वातानुकूलित सुविधा, ऑक्सिजनची व्यवस्था करण्यात आली. डॉक्टर, परिचारिकांची नियुक्ती करण्यात आली. सुसज्ज आणि सर्वसोयीयुक्त या रुग्णालयाचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते मंगळवार, दि. १८ मे रोजी झाले.








# "लसीकरण आपल्या दारी" उपक्रम

संभाव्य कोरोना लाटेवर नियंत्रण मिळविण्यासाठी कोरोना लसीकरण हा एकमेव पर्याय सध्या उपलब्ध आहे. जे नागरिक केंद्रावर जाऊन लस घेऊ शकत नाहीत, अशा दिव्यांग, वयोवृद्ध व अंथरुणास खिळलेले व्यक्ती यांच्यासाठी महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या पुढाकारातून "लसीकरण आपल्या दारी" उपक्रम राबविण्यात आला.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# 'युवा स्वास्थ्य कोविड-१९ लसीकरण' मोहिम

स्थायी लसीकरण केंद्रांसोबतच शहराच्या विविध भागात जाऊन राबविण्यात येत असलेल्या 'लसीकरण आपल्या दारी' मोहिमेला देखील नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी 'युवा स्वास्थ्य कोविड-१९ लसीकरण' मोहिम राबविण्यात आली. या माध्यमातून शहरातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्यात आले.




जापनीज इन्सेफेलाइटिस लसीकरणाचा
व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# महाकाली यात्रेत 'मिशन कवचकुंडल'

ऑक्टोबर २०२१ मध्ये नवरात्रीनिमित्त महाकाली मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. संभाव्य कोरोना लाट रोखून धरण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेमार्फत 'मिशन कवचकुंडल' अभियान राबविण्यात आले. कोरोना लसीच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या भाविकांना दर्शनासाठी टोकन देण्यात आले. ज्यांनी लस घेतलेली नाही, अशांसाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेमार्फत लसीकरण केंद्र सुरू करण्यात आले. चंद्रपूर शहरातील कोरोना लसीकरणाचा टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने मनपातर्फे खासगी रुग्णालये, सामाजिक भवन, मंदिर येथेही लसीकरण केंद्र सुरु करण्यात आले.

राष्ट्रीय लसीकरण दिन सत्कार समारंभाचा व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।



## रुग्णांसाठी रक्तदान शिबीर

डेंग्यूच्या साथीचा प्रादुर्भाव असताना रक्ताची कमतरता जाणवू नये यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या सर्व झोन कार्यालयात रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराला अधिकारी, मनपा कर्मचारी व प्रभागातील नागरिकांनी देखील उत्तम प्रतिसाद देत रक्तदानास स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेतला.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।







## सानुग्रह अनुदानासाठी हेल्पडेस्क

कोविड-19 या आजाराने मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना शासनातर्फे ५० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात आले. त्यासाठी शासनाने विकसित केलेल्या पोर्टलवर 'कोविड19' मुळे मृत पावलेल्या व्यक्तींचे नातेवाईक, वारसांना ऑनलाइन अर्ज करायचे होते. अर्ज भरण्याकरीता मृत व्यक्तीच्या नातलगांना साहाय्य करण्यासाठी आणि सविस्तर माहिती समजावून सांगण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत हेल्पडेस्क स्थापन करण्यात आले. सदर मदत केंद्रावर विनाशुल्क ऑनलाईन अर्ज भरण्यात आले. त्याचा शहरातील मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना लाभ मिळाला.














# लसीकरण लकी ड्रॉ

महानगरपालिका क्षेत्रातील लसीकरणाची टक्केवारी वाढावी व नागरिकांना लसीकरणास प्रोत्साहन मिळावे, यासाठी आयोजित लसीकरण बंपर लकी ड्रॉ हा उपक्रम घेण्यात आला. कोविड लसीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी दि. १२ नोव्हेंबर ते २० डिसेंबर २०२१ दरम्यान बंपर लकी ड्रॉ उपक्रम घेण्यात आला. या योजनेस मोठा प्रतिसाद मिळाला. ता. २४ डिसेंबर रोजी सोडत काढण्यात आली. यात विजेत्या ठरलेल्या भाग्यवंतांना २६ जानेवारी रोजी बक्षीस देऊन गौरवण्यात आले. यात प्रथम बक्षीस भाग्यश्री गजभिये यांना फ्रिज, दुसरे बक्षीस विनोद लाडे यांना वॉशिंग मशीन, तिसरे बक्षीस रामप्रसाद बिस्वास यांना एलईडी टीव्ही, तर प्रोत्साहनपर बक्षिस विजेते रणजित कुळसंगे, सुनीता शेंडे, उमा मोहुर्ले, तिरुपती झाडे, अरविंद मानकर, कल्पना तारगे, ताराबाबू सिडाम, राम मोघे, हरिश्चंद्र दोगडे, चेदीलाल गुप्ता यांना १० मिक्सर ग्राइंडर देऊन सन्मानित करण्यात आले.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।



# सलाम त्यांच्या कर्तव्याला



कोरोना विषाणूमुळे अखखे विश्व संकटाचा सामना करत आहे. भारतात दिवसागणिक कोरोना संक्रमित रुग्णांची संख्या वाढतच होती. आपले घर, शहर सोडून आज अनेक आरोग्यदूत कोरोना रुग्णांच्या जीवनासाठी सिमेवरील सैनिकांसारखे अहोरात्र लढा देत आहेत. चंद्रपूरचे भूमिपुत्र असलेल्या आणि बाहेरगावी सेवा देत असलेल्या डॉक्टरांच्या या कर्तव्याबद्दल लोकलेखा समिती प्रमुख तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात सलाम करण्यात आला. ऑक्टोबर २०२० रोजी महापौर सौ. राखी कंचर्लावार यांनी कर्तव्य बजाविणाऱ्या २४ डॉक्टरांच्या पालकांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. असाच चंद्रपूरचा एक योद्धा डॉ. तेजस हे आपल्या शहरातील नेत्ररोग तज्ञ डॉ. रेखा दांडेकर यांचा सुपुत्र आहे. तो एम. सी. एच (सुपर स्पेशलायझेशन) सायन हॉस्पिटल मुंबई येथे कार्यरत असून, मुंबई येथे कोविड हॉस्पिटल सेव्हन हिल्समध्ये कोविड केअर सेंटर मध्ये अतिदक्षता विभाग (ICU) कर्त्यव्यदक्षतेने आपली जबाबदारी पार पाडली. डॉ. रेखा दांडेकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

# वाढवूया बळ मनगटाचे

२०२० मध्ये कोरोनाच्या संकटात सेवा देणाऱ्या योद्ध्यांच्या मनगटात ताकद आणि बळ मिळावे, यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समितीद्वारे पोलीस व आरोग्य विभागातील कोविड योद्ध्यांना राखी बांधून व महापौर राखी कंचर्लावार यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे करण्यात आले. आयुक्त राजेश मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, पोलीस उपअधिक्षक शेखर देशमुख, उपमहापौर राहुल पावडे, वैद्यकीय व पोलिस विभागातील अधिकाऱ्यांना राखी बांधण्यात आली.











## कोरोना योद्ध्यांना बांधली

# "महापौर राखी"




रक्षाबंधन म्हणजे बहिण-भावाच्या प्रेमाचे बंधन! या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधून भावाचे हृदय प्रेमाने जिंकून घेते. हा सण म्हणजे पराक्रम, प्रेम, साहस किंवा संयमाचा संयोग होय. कोरोनाच्या संकटात सेवा देणाऱ्या योद्ध्यांच्या मनगटात ताकद आणि बळ मिळावे, यासाठी महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी २०२१ मध्ये "महापौर राखी" हा अनोखा उपक्रम राबविला. मागील दीड वर्षांपासून कोरोनाच्या काळात नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी प्रशासकीय सेवा देणाऱ्या कोरोना योद्ध्यांना महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी "महापौर राखी" बांधून रक्षाबंधन सण साजरा केला. जिल्हाधिकारी अजय गुल्हाने, पोलीस अधीक्षक अरविंद साळवे, मनपाचे आयुक्त राजेश मोहिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, रामनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्री. शेवाळे यांना राखी बांधली. यावेळी मिठाई आणि पुस्तिका भेट दिली.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





# स्वच्छता व पर्यावरण

## कचरा संकलनासाठी घरोघरी घंटागाडी




महिला महापौर म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर पहिले कर्तव्य म्हणून चंद्रपूर शहर स्वच्छ करण्याचा विडा उचलला. चंद्रपूर शहर स्वच्छ करायला निघाल्या. चंद्रपूर शहरामध्ये ठिकठिकाणी एकूण ६०० ते ७०० कचराकुंड्या होत्या. डस्टबिन मुक्त चंद्रपूरचे स्वप्न महापौरांनी बघितले. घरोघरी जाऊन कचरा संकलन करणे आणि शहर स्वच्छ करण्याचा ध्यास घेतला. प्रारंभी प्रचंड विरोध झाला. विरोधकांनी पुतळे तयार करून ते जाळले. परंतु, निंदकाच्या निंदेकडे लक्ष न देता आपले कार्य सातत्याने सुरूच ठेवले. घरोघरी शौचालय हा उपक्रम यशस्वीपणे राबविला. स्वच्छतेच्या या कार्यासाठी चंद्रपूर शहराला विदर्भातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला. तर २०२० मध्ये महाराष्ट्रातून पहिल्या क्रमांकावर आले. माजी मंत्री सुधिरभाऊ मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ शहराचा हा वसा हाती घेतला. विविध क्षेत्रांत यशस्वी झालेल्या व्यक्तींना स्वच्छता दूत म्हणून ब्रँड अँबेसिडर नियुक्त केले. त्यांच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व जनतेला पटवून दिले. कचरा विलगीकरण, नागरिकांचा सहभाग आणि स्वच्छता विभागाची यंत्रणा यांच्यावर महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी स्वतः लक्ष ठेवले. १२ जून २०१५ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनात नागपूर येथे स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छतेचा संकल्प केला. सप्तपदीत समाविष्ट असणाऱ्या सहभागाचा ठाम निर्धार, व्यापक लोकसहभाग, शंभर टक्के शौचालयाचा वापर, कचऱ्याचे संकलन-वर्गीकरण-वाहतूक, कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया, सांडपाण्यावर प्रक्रिया आणि हरीत स्वच्छ निर्मिती या सात मुद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्वप्न बघितले.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**

## कचऱ्याच्या व्यवस्थापनसाठी डस्टबीन

दर दिवशी निघणाऱ्या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी चंद्रपूर शहर स्वच्छ अभियानांतर्गत महापौर राखी कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रत्येक कुटुंबाला डस्टबीन वितरीत करण्यात आल्या. महानगरपालिकेच्या गांधी चौकाजवळील मैदानात लोकनेते आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या हस्ते डस्टबीन वाटप झाले. या डस्टबीनमधील कचरा महानगरपालिकेच्या वतीने जमा केला जात आहे. ८२ हजार २० मालमत्ताधारकांना डस्टबीन वितरणाचे उद्दिष्ट होते. प्रत्येक मालमत्ता धारकास हिरवी व निळी अशा दोन डस्टबीन देण्यात आल्या. एकामध्ये ओला तर दुसऱ्या डस्टबीनमध्ये सुका कचरा टाकला जात आहे. शहरात शौचालयाचा कार्यक्रमही मनपाच्या वतीने मोठ्या प्रमाणावर राबविला गेला. सहा हजार ६९२ इतके वैयक्तिक शौचालयाचे मनपाचे उद्दिष्ट होते.





# स्वच्छ अमृत महोत्सवात चंद्रपूरचा गौरव; थ्री स्टार मानांकन

स्वच्छ भारत अभियान - शहरी 2.0 चा भाग म्हणून गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालयाने आयोजित केलेल्या 'स्वच्छ अमृत महोत्सवा'मध्ये भारतातील सर्वात स्वच्छ शहरांच्या पुरस्कार विजेत्यांचा गौरव करण्यात आला. यात कचरामुक्त शहरांच्या तारांकित क्रमवारी नियमाअंतर्गत निर्धारित केलेल्या 3- तारांकित (थ्री स्टार) मानांकनमध्ये चंद्रपूर शहराचा गौरव करण्यात आला. राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे पार पडलेल्या सोहळ्यात चंद्रपूरनगरीच्या महापौर सौ. राखी संजय कंचर्लावार तसेच आयुक्त राजेश मोहिते यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# आझादी का महोत्सव मोहिमेअंतर्गत कचऱ्यातून कला



चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून "आझादी का महोत्सव मोहिमे"अंतर्गत वेस्ट टू आर्ट (कचऱ्यातून कला) या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. घरामध्ये असलेल्या जुन्या वस्तू वापरल्या जात नाही. मात्र, जुन्या वस्तूंचा वापर करून विविध सजावटीच्या वस्तू साकारण्यात आल्या. निरुपयोगी काचेच्या बॉटलसचा वापर करून सुंदर फ्लॉवर पॉट तयार केले. प्लास्टिक बॉटल्सचा वापर करून फेस्टिव डेकोरेशन बनविले. प्रदर्शनी भरवून विजेत्या स्पर्धकांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।








# विसर्जन आपल्या दारी

चंद्रपूर शहरात मोठ्या प्रमाणात बाप्पाची स्थापना होते. १० दिवसांनी मोठ्या भक्ती भावाने अनंत चतुर्दशीच्या दिवशी निरोप देण्यात येतो. शहरात सुमारे १० हजाराच्या आसपास गणेशमूर्तीचे विसर्जन होते. त्यामुळे रामाला तलाव, इरई नदी आणि अन्य जलस्रोत दूषित होऊ लागले होते. त्यावर आळा घालण्यासाठी विसर्जन करण्याकरिता कृत्रिम तलाव तयार केले. निर्माल्यासाठी निर्माल्य कलश लावण्यात आले.निसर्ग रक्षणासाठी पर्यावरणपूरक गणेशोत्सव संकल्पना पुढे आणली. गणेशभक्तांनीही त्यास प्रतिसाद दिला आहे. २०२१ या वर्षात पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेने व्यापक जनजागृती केली. त्याचा सकारात्मक प्रतिसाद दिसून आला. या गणेशोत्सवात एकही पीओपी मूर्तीची विक्री झाली नाही. शहरातील घरगुती आणि सार्वजनिक गणेश मंडळांनी मनपाच्या कृत्रिम कुंडाचा लाभ घेत ८०६४ गणेश मूर्तीचे विसर्जन पर्यावरणपूरकरित्या केले. तसेच १४३ गणेशभक्तांनी मनपाच्या फिरत्या विसर्जन कुंडाचा लाभ घेतला. दरम्यान, कृत्रिम कुंडात संकलित झालेली माती पुनर्वापरासाठी मूर्तिकारांना परत करण्यात आली आहे.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

## घरगुती गणेश उत्सव आणि सार्वजनिक गणेश मंडळांना पारितोषिक

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी इको फ्रेंडली गणेशोत्सव साजरा करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी यंदा महानगरपालिकेच्या माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून पर्यावरणस्नेही बाप्पा स्पर्धा घेण्यात आली. यात घरगुती गणेश उत्सव आणि सार्वजनिक गणेश मंडळांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यातील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.





# १८०० गणेश भक्तांना जास्वंद रोपटे

महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून यंदा पर्यावरणस्नेही बाप्पा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यानुसार पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून मनपाच्या कृत्रिम विसर्जन कुंडात विसर्जन करणाऱ्या १८०० गणेशभक्तांना जास्वंदाचे रोपटे आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.







# सफाई मित्रांना युनिफॉर्म, सुरक्षा किट भेट




केंद्र सरकारच्या सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज २०२१ अंतर्गत चंद्रपूर मनपाकडून सफाई मित्र व जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. मलनि:सारण वाहीनी, सेफ्टी टैंक व मॅनहोलमध्ये कार्यरत कामगारांना सफाईसाठी अधिकृत आणि शाश्वत यंत्रणेमध्ये समावेश करुन घेणे हा मुख्य उद्देश या अभियानाचा आहे. जीवित हानी टाळण्यासाठी मलनि:सारण वाहीनी, सेप्टीक टँक व मॅनहोल मध्ये मानवी वापर कमी करून यांत्रिकीकरणाच्या साफसफाईला प्रोत्साहन देण्यावर भर आहे. काही अत्यावश्यक ठिकाणी धोकादायक पध्दतीने सफाई करण्याची गरज भासल्यास सुरक्षेची साधने आवश्यक असतात. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून 'सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज' हे अभियान राबविण्यात येत आहे. मनपाच्या मुख्य प्रशासकीय कार्यालयात सफाईमित्रांना युनिफॉर्म, सुरक्षा किट भेट देऊन त्याचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. सफाई मित्रांना हेल्मेट, हॅन्ड ग्लोव्हज, गमबूट, मास्क, युनिफॉर्म, फस्ट एड बॉक्स, रिफेलेवटींग जॅकेट, टॉर्च आदी साहित्य भेट देण्यात आले.




# माझी वसुंधरा आणि स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्पर्धा



स्वच्छता विभागाच्या वतीने माझी वसुंधरा आणि स्वच्छ भारत अभियानांतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. स्वच्छतेची पैठणी, रेन वॉटर हार्वेस्टिंग, कंपोस्टिंग, प्लास्टिक कलेक्शन, ई वेस्ट कलेक्शन आदींबाबत स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये चंद्रपूर शहरातील विविध भागातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पैठणी व सन्मानपट्टीका देऊन गौरव करण्यात आला.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।





# "इलेक्ट्रिक वाहने व सौर उपकरण" प्रदर्शन



वाहतुकीतील प्रदूषण कमी करण्याच्या दृष्टीने पेट्रोल-डिझेलवरील वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढावा, यासाठी चंद्रपूर महानगरपालिका विविध उपक्रम राबवित आहे. नागरिकांना इलेक्ट्रिक वाहने खरेदीसाठी सोयीचे व्हावे, यासाठी गांधी चौक स्थित चंद्रपूर शहर महानगरपालिका मुख्यालय शेजारील पार्किंगमध्ये चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरच्या वतीने माझी वसुंधरा अभियान २.० व राष्ट्रीय शुद्ध हवा कार्यक्रमाअंतर्गत गुरुवार, दिनांक १६ डिसेंबर रोजी आयोजित इलेक्ट्रिक वाहने व सौर उपकरण प्रदर्शनाला शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. इलेक्ट्रिक वाहने शून्य उत्सर्जनामुळे पर्यावरण संवर्धनासाठी फायदेशीर आहेत. कमी दुरुस्ती खर्च, चालवण्यास सुलभ, घरी चार्जिंग करणे सोयीचे, कमी खर्चात चार्जिंग, ध्वनी प्रदूषणविरहित आहे. सौरऊर्जा हा ऊर्जेचा नैसर्गिक आणि प्रदूषणरहित स्त्रोत समजला जातो. त्यामुळे चंद्रपूर मनपा सौर ऊर्जेच्या वापरावर भर देत आहे.

# कचरा संकलन व्यवस्थापन, विलगीकरण व पुनर्वापर कार्यशाळा




चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छ भारत अभियानांतर्गत कचरा संकलन व्यवस्थापन, विलगीकरण व पुनर्वापर यावर कार्यशाळा घेण्यात आली. सर्व कचरा हानिकारक नसतो. कचऱ्याचे अनेक प्रकार असतात. कचऱ्याकडे बघण्याचा आपला दृष्टीकोन बदलायला हवा. कचरा ही समस्या म्हणून न पाहता त्याकडे एक संधी म्हणून पाहायला हवे, असेही सांगितले. तसेच कचरा विलगीकरण तसेच त्याचा पुनर्वापर आणि व्यवस्थापन प्रभावी पद्धतीने कसे करावे याची माहितीही उपस्थित नागरिक व विद्यार्थ्यांना देण्यात आली. काच, धातू, प्लास्टिक, कागद, शाम्पू, बिस्किटे, गोळ्या, चॉकलेट यांची वेष्टने पुनर्निमितीसाठी वापरता येतात, हे उदाहरणासह पटवून दिले.





# छत्रपती नगर येथे वृक्षारोपण अन् वृक्षांचा वाढदिवस

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरच्या वतीने एकता गणेश मंडळ, छत्रपती नगर, शास्त्रीनगर प्रभाग क्र. २ येथील बगिच्यात १ जुलै रोजी वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. प्रारंभी छत्रपतीनगर येथील महिला आणि गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांनी वृक्षदिंडी काढली. आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वडाच्या झाडाला पाणी देऊन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कडुलिंब, करंजी जांभूळ, सप्तपर्णी, शिसम आदी वृक्षांच्या रोपट्याचे रोपण करण्यात आले. मागील वर्षी याच दिवशी लागवड केलेल्या वृक्षांना एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. वृक्ष लागवड आणि संवर्धनासाठी पुढाकार घेणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.



व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।



# स्वच्छतादूत अनिकेत आमटे यांचा विशेष सत्कार

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूरतर्फे दरवर्षी शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण व्हावी तसेच त्यांना स्वच्छतेचे महत्व कळावे, यासाठी स्वच्छतादूत (ब्रॅण्ड ॲम्बेसेडर) म्हणून प्रसिद्ध समाजसेवक अनिकेत आमटे यांची निवड करण्यात आली. यानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला.

# उषाताई बुक्कावार यांची ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड

शहर महानगरपालिका चंद्रपूरतर्फे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या उषाताई बुक्कावार यांची ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड करण्यात आली. यानिमित्त त्यांचा महापौर कक्षात सत्कार करण्यात आला. त्यांनी मनपाच्या विविध उपक्रमात सहभाग घेऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने विशेष योगदान दिले.



व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।




# मदत/अनुदान/सूट

## मालमत्ता करात शास्तीचा लाभ




कोविड- १९ विषाणूचा प्रादुर्भाव पसरु नये, यासाठी शासनाकडून माहे मार्च २०२० पासून वेळोवेळी लॉकडाऊन करण्यात आले. त्या काळात व्यापार व व्यवसाय बंद असल्यामुळे व्यापारी वर्ग आणि समाजाचे घटक कामगार वर्ग यांना आर्थिक अडचण निर्माण झाल्यामुळे थकीत कराचा भरणा करता आला नाही. अशा घटकांना दिलासा देण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकेमार्फत मालमत्ता कर व इतर करांचा एकरकमी भरणा करणाऱ्याना १०० टक्के शास्तीत माफी देण्यात आली. १० जानेवारी ते १५ फेब्रुवारी २०२२ पर्यंत १०० टक्के, १६ ते २८ फेब्रुवारीदरम्यान ७५ टक्के, तर १ ते १५ मार्चपर्यंत ५० टक्के सूट देण्यात आली. त्याचा चंद्रपूरकर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घेतला.



## कोरोनामुळे पालक गमावलेल्या विद्यार्थांना सानुग्रह मदत

कोरोनाच्या महामारीत अनेकांचा मृत्यू झाला. घरचा कर्ता पुरुष, महिला यांचा मृत्यू झाल्याने अनेकांचे संसार उध्वस्त झाले. लहान मुले पोरकी झाली. हे दुःख फार मोठे आहे. अशा या संकटाच्यावेळी पाल्यांना मदतीची गरज आहे. कोरोनाच्या महामारीमुळे चंद्रपूर महानगरपालिकेच्या शाळांतील ३ विद्यार्थ्यांच्या पालकांचे निधन झाले. यात दोघांनी आई तर एकाने वडील गमावले. पालकांना गमावलेल्या महानगरपालिकेच्या शाळांतील तीन विद्यार्थ्यांना प्रत्येकी ३१ हजार रुपये सानुग्राह मदत देत असल्याची घोषणा महापौर राखी संजय कंचर्लावार यांनी केली.

## दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत सानुग्रह निधी

शहर महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांग नागरिकांकरिता दिव्यांग कल्याण निधीअंतर्गत पाच टक्के निधी राखीव ठेवण्यात येते. त्यानुसार चालू आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात दिव्यांगांकरिता निधीची तरतूद करण्यात आली होती. चंद्रपूर महानगरपालिका अंतर्गत नोंदणी करण्यात आलेल्या दिव्यांग नागरिकांना मनपातर्फे दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत सानुग्रह निधी देण्यात येत आहे. यात २०१८ ते २०२२ या काळात २ कोटी ३२ लाख ६३ हजार २५० इतकी रक्कम आरटीजीएसद्वारे अदा केली आहे. २०२०-२१ मध्ये ८७९ लाभार्थ्यांना ६ लाख ५९ हजार २५० रुपये निधीतून साहित्य किट वाटप करण्यात आली.





# गरोदर माता लाभार्थ्यांना अनुदान किट

चंद्रपूर शहर महानगरपालिकेद्वारे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेअंतर्गत गरोदर माता लाभार्थ्यांना अनुदान किट वाटप करण्यात आले. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते शहरातील नोंदणी झालेल्या ७१ गर्भवती मातांना प्रमाणपत्र व किट वितरित करण्यात आले.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**

# रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना धनादेश



चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीत २०१६ पासून ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे अनेक गरीब कुटूंबाना हक्काचे घर उपलब्ध झाले. चंद्रपूर शहर महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या रमाई घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना लोकलेखा समितीचे अध्यक्ष आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते धनादेश वितरण करण्यात आले.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**



## शैक्षणिक/क्रीडा

# क्रीडा कौशल्य व अंगभूत गुणांना वाव; चंद्रपूर महापौर चषक




महापौर चषक



» **शहरातील** विविध खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य व अंगभूत गुणांना वाव देता यावा तसेच खेळांविषयी आवड असलेल्या तरुण मुला-मुलींनी शहराचे नाव राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजवावे, यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूरच्या वतीने फेब्रुवारीदरम्यान महापौर चषक कबड्डी स्पर्धा २०१९ चे आयोजन करण्यात आले होते.

» **जिल्हा** कारागृहामागील कोहिनूर क्रीडांगण येथे ही स्पर्धा आयोजित करण्यात आली. चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे चंद्रपूर शहरातील खेळाडूंसाठी मान्यताप्राप्त संघटनांमार्फत विविध क्रीडा प्रकारांमध्ये महापौर चषक स्पर्धा आयोजित करण्यात आली.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।







महापौर चषक

चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने महापौर चषक अंतर्गत राज्यस्तरीय बॉडीबिल्डींग स्पर्धा २२ फेब्रुवारी २०२० रोजी गांधी चौक येथे घेण्यात आली. या स्पर्धेत राज्यभरातून मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.




व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।









**महापौर चषक**

चंद्रपूर शहर महानगरपालिका तसेच जिल्हा कुस्तीगीर संघ व श्री जगदगुरु व्यायाम शाळेच्या सहकार्याने १५ व १६ फेब्रुवारी २०२० रोजी महापौर चषक कुस्ती स्पर्धा घेण्यात आली.

व्हिडिओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# एकेकाळी तिथे घाणीचा दुर्गंध; आता ज्ञानाचा सुगंध




## संत कोलबास्वामी अभ्यासिका

भानापेठ वार्डातील एका जागेत सार्वजनिक शौचालय होते. आता घरोघरी वैयक्तिक व्यवस्था झाल्याने सार्वजनिक शौचालय रिकामे पडले होते. अशातच चंद्रपूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून अनेक विद्यार्थी शहरात शिकायला येतात. अनेकजण स्पर्धा परीक्षेची तयारी करतात. मात्र, खासगी अभ्यासिकेत पैसे भरण्याची ऐपत प्रत्येकात नसते. गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या अभ्यासिकेचा प्रस्ताव पुढे ठेवला. चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे भानापेठ वार्डात संत कोलबास्वामी अभ्यासिका साकारण्यात आली. एकेकाळी अस्वच्छतेमुळे घाणीचा दुर्गंध असलेल्या या जागेला ज्ञानाचा सुगंध देण्याचे काम मनपाने केले आहे. होतकरू विद्यार्थ्यांना युपीएससी, एमपीएससी तसेच अन्य स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी ही अभ्यासिका फार उपयोगी ठरत आहे.







# अटलबिहारी वाजपेयी अभ्यासिका

**भानापेठ** वॉर्डातील जुन्या वस्तीत नागरिकांच्या सेवेसाठी स्वच्छतागृह होते. कालांतराने प्रत्येक घरी शौचालय आले. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छतागृहात येणाऱ्यांची संख्या नाहीच्या बरोबरीत झाली. शिवाय स्वच्छतागृहातील दुर्गंधीमुळे शेजारील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम जाणवत होता. त्यामुळे येथे जुन्या स्वच्छतागृहाच्या जागेवर चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून या अटल बिहारी वाजपेयी अभ्यासिका साकारण्यात आली.

**एकेकाळी** घाणीचा दुर्गंध असलेल्या जागी आता ज्ञानाचा सुगंध पसरत आहे. या अभ्यासिकेचे उद्घाटन माजी वित्त मंत्री तथा लोकलेखा समितीचे अध्यक्ष आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते झाले. भानापेठ वॉर्डातील अंचलेश्वर वस्तीतील जुन्या स्वच्छतागृहामुळे दुर्गंधी पसरून आरोग्य बिघडत असल्याच्या तक्रारी स्थानीक नागरिकांनी नगरसेवक संजय कंचर्लावार यांच्याकडे केल्या.

**मोकळ्या** जागी क्रीडांगण निर्माण करण्याची विनंती नागरिकांनी केली. त्यानुसार त्यांनी या जागी नागरिकांच्या आग्रहास्तव अभ्यासिका बांधकाम करण्याची मागणी मनपाकडे केली. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने सार्वजनिक स्वच्छतागृहाच्या जागी अभ्यासिकेचे बांधकाम केले. आणि त्यासमोरील मोकळ्या जागी खेळाचे मैदान तयार करण्यात आले.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**











# हुतात्मा स्मारक अभ्यासिका

चंद्रपूर शहरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी, यासाठी नागपूर मार्गावरील सिव्हिल लाईन्स स्थित हुतात्मा स्मारकाचे नूतनीकरण करून सौंदर्यीकरण करण्यात आले. तसेच या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी सर्व सुविधांनी युक्त अशी अभ्यासिका साकारण्यात आली. येथे विद्यार्थांना सर्व आवश्यक पुस्तके उपलब्ध करून देण्यात आली. सुसज्ज अश्या या अभ्यासिकेत वाचन, चिंतन, मनन व अभ्यासासाठी शांत व पोषक वातावरण आहे. प्रत्येक विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था आहे. स्पर्धापरिक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना आवश्यक ग्रंथ, नियतकलिके सुद्धा येथे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

व्हिडीओ बघण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा।





# भानापेठ येथे सुसज्ज व अत्याधुनिक व्यायामशाळा



चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या माध्यमातून भानापेठ येथे सुसज्ज व अत्याधुनिक व्यायामशाळा साकारण्यात आली. नगरसेवक संजय कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून हनुमान मंदिराच्या वरच्या मजल्यावर महिला आणि पुरुषांसाठी व्यायाम शाळा उभारण्यात आली. महिला नेहमीच आपलं घर सांभाळताना आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. तर नोकरी करणा-या महिला आपलं काम करत असताना आपल्या आरोग्याची काळजी घेत नाहीत. ही बाब लक्षात घेऊन ही व्यायामशाळा साकारण्यात आली. माजी वित्त नियोजन व वने मंत्री, लोकलेखा समिती अध्यक्ष आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते श्री भगवान हनुमान यांच्या मूर्तीची पूजा करून आरती करण्यात आली. दरम्यान भानापेठ प्रकाशमय होण्यासाठी कोलबास्वामी चौक येथे हायमास्ट दिवास्तंभाचे लोकार्पण पार पडले.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**










# शैक्षणिक कार्यशाळा



महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघ, शाखा महानगरपालिका चंद्रपूरच्या वतीने महापौर राखी कंचर्लावार यांच्या प्रमुख उपस्थितीत राणी हिराई सभागृह येथे शैक्षणिक कार्यशाळा घेण्यात आली. यात प्रयोगशील मुख्याध्यापक अर्जुन कोळी (नगर परिषद कराड शाळा जि. सातारा), अरूण पवार (अहमदनगर महानगरपालिका), सुनील खेलूरकर (नाशिक महानगरपालिका), सुभाष कोल्हे (बुलढाणा), साधनाताई साळूंखे (नगरपरिषद खापोली), मायाताई कांबळे (लातूर महानगरपालिका), प्रिया सिंग (औरंगाबाद महानगरपालिका), नंदा तादंळे (नगरपरिषद लोणावळा), सविता बोरसे (नाशिक महानगरपालिका), बाबासाहेब कडकल (नाशिक महानगरपालिका), संग्राम गाढवे (नगरपरिषद कराड) सहभागी झाले होते.

## मनपाच्या शाळांचा कायापालट



कोरोनामुळे लॉकडाऊनच्या काळात शाळा बंद होत्या. अशावेळी ऑनलाईन शिक्षणाची सोय चंद्रपूर महापालिकेने सुरु केली. ज्या विद्याथ्डर्थ्यां ऑनलाईन सुविधा नाही, अशासाठी त्यांच्या घरी जाऊन ऑफलाईन शिक्षण देण्यात आले. ज्यांना कॉन्व्हेंटचं शिक्षण परवडत नाही, अशा पालकांसाठी ही शाळा मोठी संधी निर्माण करून देणारी ठरलीय. हा उपक्रमशील प्रयोग बघण्यासाठी राज्यभरातील नगरपालिका आणि महापालिका शाळांतील शिक्षकांच्या शिष्टमंडळाने चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या विविध शाळांना भेटी दिल्या. नगरपालिका व महानगरपालिका शिक्षकानी चंद्रपूर मनपाच्या शाळांना भेटी दिल्या. यात सावित्रीबाई फुले शाळा, शहिद भगतसिंग शाळा, महात्मा फुले शाळा यांचा समावेश होता.

# विद्यार्थ्यांना स्वाध्याय पुस्तिका वितरण

शहर महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थी सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांच्या शिक्षणात सातत्य राहावे यासाठी महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या संकल्पनेतून महानगरपालिका शाळेतील वर्ग १ ते १०च्या ३१७० विद्यार्थांना सर्व विषयांच्या स्वाध्याय पुस्तिका वितरित करण्यात आल्या. कोरोना प्रादुर्भावामुळे मागील दीड वर्षांपासून शाळा बंद होत्या. महानगरपालिका चंद्रपूर येथील शिक्षक-शिक्षिकानी विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहण्यासाठी विद्यार्थ्यांच्या परिसरात जाऊन ऑनलाईन वर्ग सुरू केले. आता काही प्रमाणात शाळा सुरु झाल्या आहेत. त्यांच्या शिक्षणात सातत्य राहावे, यासाठी महापौर कक्षात विद्यार्थ्यांना सर्व विषयांच्या स्वाध्याय पुस्तिका वितरित करण्यात आल्या.



## पाणी

# चंद्रपूर शहराला मिळणार अमृतमय जल

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर मार्फत केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत चंद्रपूर शहर पाणीपुरवठा योजनेचा भूमिपूजन सोहळा २८ ऑगस्ट २०१७ रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह, चंद्रपूर येथे झाला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील अमृत योजनेचा पहिला शुभारंभ शनिवार ३ एप्रिल २०२१ रोजी माजी अर्थमंत्री व विधिमंडळ लोकलेखा समिती अध्यक्ष आमदार सुधीरभाऊ मुनगंटीवार यांचे हस्ते करण्यात आला. तब्बल ३८ वर्षांनंतर तुकुम प्रभाग ०१ व १० मधील किमान ३५०० कुटुंबियांना शुद्ध पाणी नळाद्वारे घरपोच मिळाल्याने नागरिकांनी ३० हजार दिवे प्रज्वलित करून आनंदोत्सव साजरा केला.

अमृत योजनेचा लोकार्पण सोहळा



# चंद्रपूर शहराला मिळणार अमृतमय जल

**केंद्र** शासन पुरस्कृत अटल मिशन फॉर रिज्युवेनेशन ॲण्ड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) पाणीपुरवठा योजनेच्या एकुण १६ टाक्यांनुसार झोननिहाय शहरात पाणी पुरवठा करण्यात येणार आहे. त्यापैकी एकुण १० झोन कार्यान्वीत करण्यात आले आहेत. यात झोन क्र. १ (तुकुम), झोन क्र. २ (तुकुम नविन टाकी), झोन क्र . ३ ( शास्त्रीनगर), झोन क्र. ५ (बंगाली कॅम्प रय्यतवारी), झोन क्र. ६ (नेताजी चौक बाबुपेठ), झोन क्र. ७ (हिंग्लाज भवानी मंदिर), झोन क्र. ८ (महाकाली), झोन क्र. ९ (महाकाली जुनी टाकी), झोन क्र. १० (टागोर शाळा), झोन क्र. १६ (वडगाव) कार्यान्वीत करण्यात आले आहे. उर्वरीत झोन लवकरात लवकर पूर्ण करण्यात येत आहे. शहरातील नळ जोडणीबाबत चंद्रपूर शहरामध्ये रहिवासी, वाणिज्य व इतर अश्या एकुण ८६,९ ४७ मालमत्तांची नोंद आहे. अस्तित्वातील नळ कनेक्शनची संख्या ३२, २१० आहे. भविष्यामध्ये वाढणाऱ्या मालमत्तांची संख्या लक्षात घेऊन नळ जोडणी देण्याचे काम सुरु आहे. आत्तापावेतो ५९१८७ मालमत्तांना अमृत योजने अंतर्गत नळ जोडणी देण्यात आलेली आहे.







**पाणीपुरवठा** योजनेच्या झोन २ मधील तुकूम प्रभागातील सुमारे ३० हजार नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी २०.२० लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी उभारण्यात आली. सध्या या भागातील ३ हजार ८७४ नळधारकांना कनेक्शन देण्यात आले आहे. अमृत योजनेच्या झोन क्र. २ मधील तुकूम द्वारकानगरी येथे अमृत पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ महापौरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच जुनोना मार्गावरील हिंग्लाज भवानी मंदिराशेजारी अमृत योजनेच्या झोन ७ अंतर्गत पिण्याच्या पाण्याची टाकी उभारण्यात आली. महाकाली मंदिर परिसरातील झोन ९ मधील योजनेचे येथील ८.७ किमीची पाईपलाईन उभारण्यात आली. भिवापूर परिसरातील झोन ८, वडगाव परिसरातील झोन 18 मधील शिवनगर, साईनागर येथील योजनेचे लोकार्पण करण्यात आले. वृंदावननगर, राष्ट्रवादी नगर, तुळसिनगर परिसरातील अमृत झोन 16 मधील पाणीपुवठा योजनेचे लोकार्पण आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते पार पडले.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।






# 'रेनवॉटर हार्वेस्टिंग'साठी अनुदान योजना

घराच्या छतावर पडणारे पाणी रस्त्यांवरून वाहू लागते. नाले भरून वाहू लागतात. वाहुन जाणारे हे पाणी जर रेनवॉटर हार्वेस्टिंगच्या माध्यमातून जमिनीत साठविले गेले तर पाण्याचे दुर्भिक्ष्य नक्कीच कमी होईल, यासाठी राखीताई आग्रही आहेत. रेनवॉटर हार्वेस्टिंगला प्रोत्साहन देण्यासाठी चंद्रपूर शहर महानगरपालिकातर्फे रेन वॉटर हार्वेस्टिंग करणाऱ्यांना मालमत्ता करात २ टक्के सूट व रु. २५००/- अनुदान देण्याची योजना त्यांनी जाहीर केली. यासह अनेक महत्वपूर्ण योजना त्यांनी सुरु केल्या. मनपा हद्दीत ८७ हजार मालमत्ता आहेत. यातील अधिकाधिक इमारतींमधे ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे. मनपाच्या सर्व ५ इमारती, २९ शाळा, ६ सार्वजनिक आरोग्य केंद्रे, १२ सार्वजनिक शौचालये अशा एकूण ५२ इमारतींवर रेन वॉटर हार्वेस्टिंग यंत्रणा बसविण्यात आली आहे. तसेच शासकीय कार्यालये, जिल्हा परिषद कार्यालय, तहसील कार्यालय, नियोजन भवन कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, कृषी भवन इत्यादी इमारतींवर मनपातर्फे रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यात आले आहे. शहरात भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खोलवर जात आहे. त्यामुळे उन्हाळ्यात पाणी टंचाईला तोंड द्यावे लागते. यावर उपाययोजना म्हणून पावसाळ्यात पडणारा प्रत्येक पावसाचा थेंब हा जमिनीत जिरविण्याची आवश्यकता आहे. यासाठी जागतिक महिला दिनानिमित्त झोन क्र.1 येथील लक्ष्मीनगर, वडगांव येथे महापौर राखीताई कंचर्लावार यांच्या उपस्थितीत रेन वॉटर हार्वेस्टिंग संदर्भात जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**

# सांडपाण्यावर प्रक्रिया; 'रेड टँकर' उपक्रम



चंद्रपूर शहर महापालिकेच्या माध्यमातून जलप्रदूषण रोखण्यासाठी "माझी वसुंधरा अभियाना"अंतर्गत सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात येत आहे. या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी "रेड टँकर" ही अभिनव योजना अंमलात आणण्यात आली असून, त्याचा शुभारंभ बुधवार, दिनांक २६ जानेवारी रोजी महापौर सौ. राखी संजय कंचर्लावार यांच्या हस्ते झाला. सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मनपामार्फत रहमतनगर परिसरात २५ एमएलडी क्षमतेचे तर पठाणपुरा परिसरात ४५ एमएलडी, तर आझाद बगीचा येथे ५ एमएलडी क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र आहे. हे पाणी घरगुती व खासगी इमारत बांधकाम आणि अन्य कामासाठी, झाडांसाठी, चौक सौंदर्यीकरण, शौचालय, कारखाने आदी ठिकाणी वापरता येऊ शकते. मनपाच्या टँकरद्वारे ४०० रुपये प्रति टँकर, तर संबंधितांच्या टँकरला १५० रुपये प्रति टँकर प्रमाणे पाणी देण्यात येणार आहे.

**व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।**





## वैशिष्टपूर्ण कामे

# चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघासाठी सुसज्ज भवन





व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

चंद्रपूर शहरातील सिव्हील लाईन्स मार्गावरील वरोरा नाका येथे चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघासाठी शहर विकास निधी अंतर्गत माहिती व सुविधा केंद्राचे बांधकाम करण्यात आले. माजी पालकमंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या निधीतून बांधकाम झाले. २६ जानेवारी २०१९ रोजी भूमिपूजन झाल्यानंतर सुसज्ज इमारत बांधण्यात आली. १० जानेवारी २०२१ रोजी लोकार्पण पार पडले. ही इमारत अटी व शर्तीनुसार चंद्रपूर श्रमिक पत्रकार संघ, चंद्रपूर यांना संचालन व देखभालीकरीता हस्तांतरित करण्याचा ठराव मनपाच्या आमसभेत महापौर राखी कंचर्लावार यांनी घेतला.

# नेताजी चौक बाबुपेठ येथे पोलीस बीटसाठी जागा



नेताजी चौक, बाबुपेठ परिसरात एका तरुणीवर प्राणघातक हल्ला झाल्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी येथे पोलीस चौकी सुरु करण्याची मागणी नागरिकांनी केली. त्यानुसार आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या सुचनेनुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेमार्फत जागेची व्यवस्था करुन देण्यात आली. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने व कायदा व सुव्यवस्था करीता नेताजी चौक, बाबुपेठ या परिसरात पोलीस बीट सुरु झाले.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।







# विविध रस्ते विकास

एप्रिल २०१७ ते एप्रिल २०२२ या काळात मनपा निधी, नागरी दलित सुधार योजना, नगरोत्थान निधी, पायाभूत सुविधांचा विकास निधी व इतर निधीअंतर्गत विविध रस्ते विकासकामे यासाठी ६६ नगरसेवकाच्या प्रभागात १ हजार ९८७ विकासकामे करण्यात आली. त्यासाठी १९० कोटी ६८ लाख ९६ हजार ३१८ इतक्या निधीतून रस्ते विकासाची कामे पूर्ण झाली आहेत. या निधीतून कोनेरी स्टेडियम नूतनीकरण, बाबुपेठ येथील स्टेडियम बांधकाम, महाकाली मंदिर प्रभागात झरपट नदीचे सौदर्यीकरण करण्यात आले.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# घरकुल योजना

चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीत २०१६ पासून ही योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या योजनेमुळे अनेक गरीब कुटूंबाना हक्काचे घर उपलब्ध झाले. २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीत घरकुल निर्माण समितीने घरकूल योजनेत ७८८ लाभार्थ्यांच्या घरकुलाला मंजुरी दिली. यातील ४०९ घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहेत. १८० घराचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. याशिवाय प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत १०५९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. यातील ९१९ लाभार्थ्यांना हप्ते वितरित करण्यात आले.

व्हिडीओ बघण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा।

# मनपाच्या शहरी बेघर निवारा केंद्रात सुविधा

चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या वतीने दीनदयाल अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत शहरी बेघर निवारा केंद्र चालविण्यात येतो. येथे शहरी बेघर लोकांना राहण्याची सोय आहे. चंद्रपूर शहरामध्ये नागरी वस्त्यांमध्ये वन्यप्राण्यांचे आगमन वाढले. मनपाच्या माधमातून पोलिसांच्या सहकार्याने बेघर व्यक्तींना हलविण्यात आले. त्यासाठी विशेष वाहन व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय शहरातील बेघरांना थंडीपासून संरक्षण उपलब्ध करून देण्यात यावे, यासाठी नागरी भागातील बेघरांकरीता निवारा सुरू करण्यात आला. मनपा राष्ट्रीय नागरी उपजीविका कर्मचाऱ्यांनी रात्री बस स्थानक, रेल्वे स्टेशन, उड्डाणपुलांखाली बेघरांचा शोध घेतला. त्यात आढळून आलेल्यांना बेघर निवारा केंद्रात दाखल करण्यात आले.








# माता महाकालीची यात्रा
# भाविकांची काळजी

**चंद्रपूरची** आराध्य दैवत माता महाकालीची यात्रा दरवर्षी होत असते. आंध्रप्रदेश, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील भाविकवर्ग मोठ्या प्रमाणात चंद्रपुरात दाखल होतो. त्यांच्यासाठी आरोग्य, स्वच्छता, वैद्यकीय सेवा आणि पाणीपुरवठ्यासह निवासाची व्यवस्था केली जाते. दुकानदारांना जागावाटप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने यात्रा परिसरात यात्रा कार्यालयाची स्थापना करण्यात आली. या कार्यालयाचे उद्घाटन महापौर राखी संजय कंचर्लावार यांच्या हस्ते झाले.





**भाविक** झरपट नदीत पवित्र स्नान करतात. त्यासाठी गौतमनगर येथील बैल बाजारपासून झरपट नदी पात्रातील इकॉर्निया अड़विण्याकरीता ताटव्याचे बांध तयार करण्यात आले. येणाऱ्या भाविकांना आंघोळीकरिता झरपट नदीचे पात्र स्वच्छ करण्यात आले. अंचलेश्वर बंधाऱ्याजवळ शॉवरची व पिण्याचे पाण्याकरिता नळाची व्यवस्था करण्यात आली. बैलबाजार भागात आंघोळीकरिता व्यवस्था केली. भाविकांना शौचालयाकरिता अंचलेश्वर गेट, महाकाली पटागंण येथील सुलभ शौचालय तर महानगरपालिकेचे फिरते शौचालय व बैलबाजार भागात कच्चे शौचालय उभारण्यात आले. अंचलेश्वर गेट ते बागला चौकपर्यंत रस्ता दिभाजकाला रंगरंगोटी करुन परिसर सुशोभित करण्यात आला. महाकाली यात्रा कार्यालयात यात्रा पोलिस चौकी व दवाखाना स्थापन करण्यात आला. या दवाखाण्यात रुग्णांना मोफत तपासणी करुन मोफत औषधोपचार देण्यात आले. यात्रा परिसरात रुग्णवाहिका व्यवस्था करण्यात आली.





# ११० पथदिव्यांचे लोकार्पण

चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीमध्ये ई.ई.एस.एल. मार्फत १६७६४ जुने पारंपारीक पथदिवे बदलवुन १९४६८ नविन एल.ई.डि. पथदिवे लावण्यात आले. चंद्रपुर शहराच्या मुख्य रस्त्यावर (जसे की, नागपुर रोड, बल्लारशाह बासपास रोड, अंचलेश्वर गेट ते बागला चौक, दाताळा रोड) ई . ठिकाणी आधुनिक पध्दतीचे पथदिवे खांब लावण्यात आले. नागपूर रोडवरील प्रियदर्शनी चौक ते गजानन महाराज मंदीर चौकापर्यंत असलेले अस्तित्वातील खांबावर एल.ई. डी. सिरीज लाऊन सौंदर्यीकरणाचे काम करण्यात आले. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीवर उर्जा बचतीचे दृष्टीने ५० किलो वॅट क्षमतेचे सोलर पॅनल लावण्यात आले. विविध प्रभागांमध्ये सन २०१७ पासून आतापावेतो जवळपास ११० हायमास्ट उभारणीचे काम करण्यात आले.



भारतीय जनता पार्टीच्या कार्यक्रमात सहभागी महापौर राखी संजय कंचर्लावार.







## महापौर चषक संगीत रजनी

चंद्रपूर शहरात सांस्कृतिक वातावरण तयार व्हावे, या हेतूने महापौर चषकाअंतर्गत विविध आर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले होते. २४ जानेवारी २०१६ रोजी संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. यात गायिका वैशाली सामंत, अभिनेता मिलिंद गुणाजी, नृत्यांगणा भाग्यश्री चिरमुले यांनी सहभाग घेतला होता.


राखी संजय कंचर्लावार
महापौर पदी पदग्रहण
डिसेंबर रोजी
सौ. राखी संजय कंचर्लावार हे



सौ. राखीताईंचा जन्म वणी (जिल्हा यवतमाळ) येथील. अर्थशास्त्रात एम.ए. असलेल्या राखीताईंना रांगोळी, संगीत, गायन आणि पेंटिंगमध्ये आवड आहे. त्या पूर्वाश्रमीच्या राखी प्रभाकर गुंडावार. वडील कापड व्यावसायिक. काकू प्रभा गुंडावार वणीच्या नगराध्यक्ष होत्या. विवाहानंतर राखी संजय कंचर्लावार झाल्या. मामेसासरे रमेशभाऊ कोतपल्लीवार हे भानापेठ वॉर्डाचे नगरसेवक आणि पुढे चंद्रपूर नगरपरिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनी नगरपरिषदेचा कारभार उत्तम रीतीने चालविला. रमेश भाऊंच्या राजकारणाचा आणि समाजसेवेचा प्रभाव राखी ताईंच्या कुटुंबावर होता. रमेश भाऊच्या सोबतीने पती संजय यांचा राजकारणात प्रवेश झाला. रमेशभाऊनंतर भानापेठ वॉर्डाचा लोकसेवेचा वारसा संजय कंचर्लावार यांनी पुढे नेला. सलग ४ वेळा ते नगरसेवक म्हणून निवडून आले. तत्कालीन नगरपरिषदेचे दोन वेळा उपनगराध्यक्ष होते. चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे ते विद्यमान नगरसेवक आहेत. राखीताईंना माहेरी आणि सासरीदेखील राजकीय धडे गिरवायला मिळाले.

२५ ऑक्टोबर २०११ मध्ये नगरपालिका बरखास्त होऊन महानगरपालिका स्थापन झाल्यावर २०१२ मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली. भानापेठ प्रभागात महिला आरक्षण होते. पती संजय कंचर्लावार यांच्या आग्रहास्तव उमेदवारी दाखल केली आणि पहिल्याच प्रयत्नात निवडून आल्या. राजकारणात येण्याची ही पहिलीच वेळ. आज भानापेठ वॉर्ड म्हणजे कोतपल्लीवार नंतर कंचर्लावार कुटुंबियांसाठी बालेकिल्लाच. राखीताईंनी नगरसेवक म्हणून उत्तमरीत्या काम केले. आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. अडीच वर्षांनी पहिल्या महापौरांचा कार्यकाळ संपला आणि पुढील अडीच वर्षासाठी निवडणूक झाली. ३०/१०/२०१४ रोजी महापौरपदाची निवड झाली. त्यात विजयी झाल्या. चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीतील महापौर कक्षातील विराजमान होणाऱ्या त्या पहिल्या महापौर. खुर्चीवर बसल्यावर अनेक आव्हाने होती. पुढील अडीच वर्षे कोणती कामे करायची, याची ब्लू प्रिंट त्यांनी तयार केली. ही यादी नुसती तयारच केली नाही, तर प्रत्यक्ष कृतीत आणि कार्यातून करून दाखवली. त्यानंतर २०१७ मध्ये झालेल्या मनपा निवडणुकीत त्या साईबाबा वॉर्ड येथून विजयी झाल्या. २०१९ मध्ये पुढील अडीच वर्षासाठी पुन्हा महापौर होण्याचा बहुमान मिळाला. पदावर बसल्यानंतर अवघ्या काही दिवसातच कोरोना महामारीला प्रारंभ झाला. संपूर्ण अडीच वर्षांचा कार्यकाळ कोरोनाशी लढण्यात गेला. मात्र, अशा परिस्थितीतही त्यांनी शहराच्या विकासाकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही म्हणूनच राखीताईंचे नाव आदराने घेतले जाते.